नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 06/01/2022 (गुरूवार)
(दुपार)

---

## दुखापत

पो.स्टे. पारशिवनी :— अंतर्गत 12 कि. मी. अंतरावरील सोनेगाव शेत शिवार येथे दिनांक 05/01/2022 चे 16.00 वा. दरम्यान आरोपी नामे— सुनिल प्रकाश इंगोले, रा. तामसवाडी यांचे शेत फिर्यादी नामे— देविदास मारोती हुमने वय 46 वर्ष, रा. हिंगणा बाराभाई याने ठेक्याने केले होते. आरोपीने ठेक्याचे 5,000/—रू फिर्यादीने का दिले नाही याकारणावरून झगडा करून आरोपीने बासाचे काडीने फिर्यादीचे उजव्या पायावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 324, 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार हरिश सोनभद्रे मो नं. 9527666922 हे करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. बोरी :— दिनांक 01/06/2019 ते दिनांक 20/12/2021 चे सुमारास फिर्यादी/पीडिता वय 26 वर्ष हि मैत्रीणीसोबत बुटीबोरी येथे किरायाने राहत होती. तिच्या मैत्रीणीचा वर्गमित्र आरोपी नामे— निकुल गुलाबराव निकुरे, वय 24 वर्ष, रा. वार्ड क्र. 5, बोरी याचे सोबत ओळख झाली. तो देखील यांचेच रुमवर काही दिवस राहिला व कंपनीत सिक्युरीटी चे काम करीत होता. फिर्यादी व त्याचे प्रेमसंबंध झाले तेव्हा मैत्रीण रुम सोडून निघुन गेली. फिर्यादी व आरोपी दोघे सोबत राहत होते. आरोपीने फिर्यादीस लग्नाचे आमीश दाखवून जुन 2019 पासुन वारंवार शारीरिक संबंध ठेवले. आरोपीचे घरचे लोक लग्नास तयार नसल्याने लग्नास नकार देत आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 376(2)(एन) भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलिस उपनिरीक्षक रेजीवाड मो.क्र. 9834825793 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर